shtra Times , November 22 , 201

# 'मंगलयाना'ची 'टाइम'कडून दखल

न्यूयॉर्क : चालू वर्षातील सर्वांत नावीन्यपूर्ण आणि दखल घेण्याजोगे संशोधन म्हणून जगप्रसिद्ध 'टाइम' मासिकाने मंगळ ग्रहाला गवसणी घातलेल्या भारतीय 'मंगलयाना'चे कौतुक केले असून, अंकात त्याची दखलही घेतली आहे.

'पहिल्याच प्रयत्नात मंगळावरील स्वारी भारताशिवाय कोणालाही जमलेली नाही. अमेरिका, रशिया, तसेच युरोपीय देशांना जे जमले नाही, ते २४ सप्टेंबरला भारताने करून दाखवले आहे. मंगळाच्या कक्षेत पोहोचण्याचा पहिला आशियाई देश ठरण्याचाही मान भारतालाच मिळाला आहे,' असे गौरवोद्गार 'टाइम'ने काढले आहेत. 'द सुपरस्मार्ट स्पेसक्राफ्ट' अशा शब्दांत मंगलयानाचे कौतुकही केले आहे. यंदाच्या अंकात पंचवीस नावीन्यपूर्ण संशोधनांचा आढावा घेण्यात आला असून, 'मंगलयाना'मुळे जग आणखी सुंदर, स्मार्ट होण्यास मदतच होईल असेही नमूद करण्यात आले आहे. या मासिकामध्ये नलिनी नाडकर्णी आणि प्रमोद शर्मा यांचाही त्यांच्या संशोधनाबद्दल उल्लेख केला आहे.